

# शेजारचे प्रकल्प

## राहुल श्रीवास्तव

शेजारचा प्रकल्प हा साधे-सरळ साधना ज्याद्वारे नमूनेदार तयार केलेले एक प्रतिमान आहे. ते भारतीय शाळांतील आणि महाविद्यालयातील अनेक शिक्षकांना परिचित असलेल्या प्रणालीवर आधारित आहे. सुप्रसिद्ध एकलव्य प्रकल्प हा त्यामागील महत्त्वाची प्रेरणा आहे. लोकदाटी समजून घ्यायचे साधन, अधिक संबंध जोडण्याचे संदर्भस्थान आणि स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि जागतिक या विषयी आणखी जाणून घ्यायचे साधन म्हणून स्थानिक क्षेत्राचा विचार करून प्रवर्तकांनी घेतलेला तो पुढाकार होता.

शेजारच्या प्रकल्पाचा दस्तऐवज विद्यार्थ्यांनी गोळा केला. हा दस्तऐवज दृश्य स्वरुपात आणि लिखित स्वरुपात, त्यांच्या स्वतःच्या इमारतींचा इतिहास आणि मानववंश वर्णन, घरे आणि वसतिस्थाने, त्यांच्या स्वतःच्या कौटुंबिक इतिहासाच्या संक्षिप्तीकरणाचे एकत्रीकरण करणे आणि त्यानंतर नगरीत राहणारे म्हणून, राष्ट्रीय नागरिक म्हणून किंवा इतर कुठल्याही प्रकारे त्यांनी त्यातील स्वतःची ओळख आणि मालकीच्या वस्तु यांच्या विस्तृत प्रश्नांसंदर्भात स्वतःचे स्थाननिश्चयन करणे अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी तयार केला.

'पुकार' (पार्टनर फॉर अर्बन नॉलेज, ॲक्शन अँड रिसर्च) - नगराविषयीचे ज्ञान कृती आणि संशोधन) मुंबई, शहरातील सामुहिक पायावर आधारित संशोधन या माझ्या पुकारसह सहसंस्थेचा एक भाग म्हणून विल्सन महाविद्यालयातील या प्रकल्पाच्या माझ्या स्वतःच्या अनुभवात मला असे आढळले की, जी एक कल्पना चर्चिली, ताणली आणि विविध दिशांना ओढली होती ती म्हणजे ''वारसा जतन'' ही होय.

वारसा ही संकल्पना सुरुवातीला स्थिर, वास्तुशिल्पदृष्ट्या बाह्यरेषी, आणि त्यादृष्टीने काँक्रीट इतकी कठीण संकल्पना असे आम्ही समजत होतो. विल्सन महाविद्यालयाची इमारत ही 'वारसा' इमारत आहे. महाविद्यालय 168 वर्षांचे जुने आहे आणि बहुतेक विद्यार्थी ज्या क्षेत्रात राहतात ते क्षेत्र वारसा जतन योग्य विभाग (डिस्ट्रीक्ट्स) म्हणून वर्गीकृत केले पाहिजे. यामध्ये फोर्ट, काळबादेवी, गिरगाव, महमद अली रोड, डोंगरी, या भागांचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी या भागांची छायाचित्रे काढली, त्यांचा इतिहास

लिहून काढला आणि त्यांच्याच निवासस्थानांकडे अधिक विश्वासाने पाहिले.

पण ही संकल्पना इमारतींपासून तोडली त्याचक्षणी ती वितळू लागली-पातळ होऊ लागली. वैयक्तिक, कुटुंबाची इमारती आणि वसतीस्थाने यांची चरित्रे आणि इतिहास यामध्ये प्रवाहित झाली. इतिहासाची तीव्र जाणीव बाळगून नागरी जनजीवनात जगण्याचा विशेष मार्ग म्हणून लागू करण्यात 'वारसा संकल्पना' तत्परतेने पुढे आली.

जेथे कारखाने, चाळी, उंच इमारती, दुकाने, कार्यालये, गोदी या सर्वांना सामावून घेतले तो एक भाग आणि विद्यार्थ्यांचे स्वत:चे जीवन हे शहराचा आपण कुणीतरी असण्याचे मार्ग शोधून काढण्याच्या कामी केंद्रस्थानी झाले. हा दुसरा भाग. या प्रकल्पाने अधिक शाश्वततेने या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास सुरुवात केली की नागरी जीवन इमारती, रस्ते आणि घरे यासारख्या भौतिक घटकांनी जसे बनते तसेच ते त्या घटकांमध्ये राहण्याचा प्रत्यक्ष अनुभव, निरनिराळ्या स्मृतींची विविधता, कल्पनेतील इतिहास आणि सांस्कृतिक प्रतीके यामधूनही साकार होते.

त्या विशिष्ट प्रकल्पात वारसा संकल्पना ही मध्यवर्ती होती. अभौतिक सज्ञांमध्ये 'वारसा' कसा ठरतो हे पाहणे अतिशय समयोचित ठरते. राष्ट्रीय, सांस्कृतिक आणि प्रतीकात्मक जग यांचा भाग म्हणून वारसा अत्यंत बारकाईने छाननी करावयाची यासाठी उदयास आला.

मग महत्त्वाचा प्रश्न मांडायला सुरुवात झाली. मुंबई शहर मराठी भाषा आणि नंतर हिंदू धर्म मुद्द्यावर विशिष्ठ प्रकारचा प्रतीकात्मक वारसा म्हणून विशेषाधिकारी कसे झाले? या दोहोतही ज्याचा समावेश नाही त्यांच्यावर याचा काय परिणाम? आणि शहराच्या इतिहासाशी त्यांची पद्धतशीर दुवा हा सध्याच्या शहराच्या राजकारणाच्या शब्दांत कसा समजू शकेल? संकुचित आणि शक्य तितक्या उदार शब्दांत दोन्ही बाबतीत ते शहराच्या अंतरिक वारशाचे भाग कसे बनतात? इतक्या तत्परतेने शहराच्या इतिहासाचा एक भाग व्हायचे आणि त्याचवेळी तिच्या सध्याच्या रुपात सांस्कृतिक विसंगत म्हणून दिसायचे?

अलिकडच्या काळात आमची नागरी जागांच्या बाबतीत जाणिवांनी शहरांमध्ये अनेक आव्हानांना मुख्यत: वांशिक संघर्षाच्या स्वरुपात तोंड दिले आहे. अर्थात कुणीतरी सामाजिक विषमता नागरी नियोजनाचा अभाव आणि विशेषकरून नागरिकांचे सक्तीने राजकीयकरण करण्याची चलाखी या संदर्भात त्याचे स्पष्टीकरण करेल. मग हे अजून स्पष्ट झालेले नाही की काही नागरी रहिवाशी का आणि कसे या कार्यक्रमात सहभागी होतात आणि परिचित जागांना रणांगणाचे आणि दु:खाचे स्थळ अशा स्वरुपात या ठिकाणाचा चेहराच बदलून टाकतात? (अर्थात जरी प्रत्येकवेळी ते समाधानकारक आणि पुरेसे नसले तरी)

तर हे प्रश्न कोड्यात टाकण्याचे आणि चर्चा घडविण्याचे चालूच ठेवतात आणि त्यासाठी या शेजारच्या प्रकल्पाला त्याच्या अनुभवाद्वारे निरनिराळ्या मार्गाने शहराचे कथन करून संमिश्र सिद्धान्त रुप देण्याची आणि अभ्यासाची गरज आहे. हा प्रकल्प त्याच्या धोरणांना उभारी देणारा एक विनम्र सिद्धान्ताच्या स्वरुपात पुढे आला आणि वारसा जनतेच्या संकल्पनेकडे अत्यंत तीक्ष्ण नजरेने पहाण्यास आम्हाला त्याने उद्युक्त केले 1991-92 मध्ये या शहराला घेरलेल्या नागरी दंगलीच्या संदर्भात जवळजवळ पाच वर्षे विद्यार्थ्यांबरोबर झालेल्या संभाषणावर हा प्रकल्प आधारित होता. त्यातून एखाद्याला असे उमजले की, नागरी जागा या फसवेगिरीची परिचित परिक्षेत्रे आहेत आणि हे परिचिततेच्या या असत्य जाणीवेने लोकांना प्रचारतंत्राच्या व अफवांना बळी पडावे लागले आणि या दोन्ही गोष्टींनी दंगलीमध्ये जोरदार भूमिका बजावली.

जेव्हा दंगली उसळल्या तेव्हा हे विद्यार्थी आठ ते तेरा वर्षे वयोगटातील होते आणि त्या दुर्घटनांच्या विविध स्मृती त्यांच्या गाठीशी जमल्या. भडकणारी ठिकाणे म्हणून वाटणाऱ्या- गिरगाव, महमंदअली मार्ग इत्यादी जुन्या मुंबईच्या भागातून हे विद्यार्थी आलेले होते. त्यातील काहींनी प्रत्यक्ष दंगलीत भाग घेतला होता. त्यांचा विश्वास होता की, त्यांची स्वत:ची

वसतिस्थाने त्यांना चांगल्याप्रकारे माहीत होती मात्र शत्रूराष्ट्राचा भाग म्हणून समजल्या जाणाऱ्या भागात जाण्याचे साहस त्यांनी क्वचितच केले होते. हे विशेषत: मुलींच्या बाबतीत खरे होते कारण त्यांच्या हालचालींतील प्रचंड बंधनांना त्यांना तोंड द्यावे लागे. त्यांना असे वाटे की, शहराच्या सामाजिकतेविषयी आणि इतिहासाविषयी त्यांच्या कल्पनेतील ज्ञान हे त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवापासून अगदी भिन्न आहे किंवा त्याना जे प्रत्यक्ष दिसले त्याच वास्तव गोष्टी होत.

संभाषणाच्या या पाठमालिकांनी कळस गाठला. त्यातून वसतिस्थानातील शेजारच्या कहाण्यांची देवाणघेवाण होण्यामध्ये ते गुंतले एवढेच नव्हे तर त्याची परिणती बाह्यत: शत्रू वसतिस्थाने असलेल्या एकमेकांनी एकमेकांना बोलवण्यात झाली. त्यातून जर काही साधले असेल तर त्यांच्या नागरी ओळखींच्या पुन:शोधातील तीव्र उत्तेजित अवस्थेची जाण होय.

इतर शहरांच्या बाबतीतील प्रश्नाकडे म्हणजे इतर शहरांच्या इतिहासाबद्दल कुतूहल त्याचप्रमाणे त्यांच्या शहरांच्या सरहद्दीबद्दल जाणून घेण्याची प्रबळ इच्छा, तसेच ग्रामीण नागरी जगत या बाबींकडे त्यांचे लक्ष वेधले. जग समजून घेण्याचा यामागे फक्त त्याचा उद्देश नव्हता तर, इतर ओळखखुणांना उघड करण्यासह त्याचे मुंबईशी स्वत:चे नाते जोडण्याची ती प्रक्रिया होती.

सैद्धांतिक पातळीवर, महत्त्वाची भाष्ये नमूद करण्यात आली. त्यामध्ये स्थानिक जागा गृहीत धरता येणार नाहीत आणि त्या भंगुर असल्यामुळे आणि त्या राष्ट्रीय सीमा (अर्जुन आप्पादुराईचा निबंध. या प्रकल्पांकरिता वसतिस्थानाची निर्मिती जिव्हाळ्याचा संदर्भ आहे) असल्याप्रमाणे त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे आणि नेहमी दुसरे, भंगुर असणे याला मान्यता दिली जात असल्यामुळे, जर कशाचे अनुसरण होत असेल तर सीमांच्या परिरक्षणात स्वीकार्य जागरुकता आणि तेथील नागरिकांमध्ये अनुरूप भावात्मकता भाव निर्माण करणे हे होय. स्थानिक जागांप्रमाणे गृहित धरण्याकडे कल असतो तसा धरता कामा नये आणि तीव्र विषमतेच्या आणि गरीबीच्या संदर्भात - राजकीय भडक भाष्यांसह (प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा इतर कोणतेही) ज्यामुळे नियतकालानुसार अघोर दंगलीचे बळी होतात. स्थानिक ठिकाणांच्या बाबतीतसुद्धा शांतता राखण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत. स्वत:च्या मालकीची भावना जी मालकीभावना राष्ट्रप्रेमींच्या अभिमानापासून स्वतंत्र असते ती सोडून दिली पाहिजे. या स्थानिक जागांचे जे भागीदार असतात ते निश्चित मार्गांनी अर्थ देण्याच्या बाबतीत अधोरेखित करणे आवश्यक आहे. इतिहासाचा आणि जीवन परिचयाचा शोध घेऊन आणि त्यांच आदान-प्रदान जाणीवपूर्वक करणे हे गृहीत धरणे सहज शक्य असते. वसतिस्थानाची भयावह अशी पुन:पुन्हा होणारी वांशिक हिंसा पाहिली ती टाळणे हे रोजचे जगतजीवनाचा महत्त्वाचा मार्ग आहे.

भौतिक आणि काल्पनिक जगतातील न्यायिक संयोगाच्या या टिप्पणीच्या सुरुवातीस आपण ज्याने सुरुवात केली ते नागरी वातावरण स्थापित करता येते बनवता येते.

आणि विस्तृत परिमाणी संकल्पनेपेक्षा जीवनचरित्र, कौटुंबिक इतिहास आणि वसतीस्थान यांनी एकजीव झालेली (किंवा प्रेरित झालेली) वारसा जतनाची संकल्पना लोकांना सर्व प्रकारच्या संमिश्र मार्गांनी मालकीची जाण देण्यात महत्त्वाची ठरते. त्यांनी कल्पना केल्यानुसार आणि त्यासंबंधी व बांधण्यासंबंधी लिहिल्यानुसार जे ती बनवतात, अंतिमत: त्या लोकांविषयी वारसा जतन संकल्पना असते ही जाणीव असलेल्या राजकीय कार्यक्रमासह शेजारचा वारसा जतन प्रकल्प या काल्पनिक जगताला समजावून देण्याचा प्रयत्न करते. आणि ती जेवढी शक्य आहे तेवढी जाणीवपूर्वक मनात कल्पना केलेली, त्यासंबंधी लिखित स्वरुपाची आणि मनात बांधलेल्या स्वरुपात साकारलेली, लोक आणि त्यांच्या विषयीच्या घटनांनी बनलेली अशी असली पाहिजे.

जुन्या मुंबई शहरात राहणारे बहुतेक विल्सन महाविद्यालयाचे विद्यार्थी जे या प्रकल्पाचा भाग घेत होते, त्यांनी निश्चितपणे या प्रकल्पामध्ये सहभागी झाल्यानंतर महाविद्यालय

आणि त्यांचे शेजारी या दोघांशीही स्वतंत्रपणे संपर्क साधण्यास सुरुवात केली.

त्याच ठिकाणी राहणारे असतानासुद्धा ज्याना आधुनिक मुंबईचा एक घटक म्हणून कधीच स्वीकारले गेले नव्हते. असा अनुभव ज्यांनी घेतला त्यांचे पत्ते (ते पत्ता सांगण्यापूर्वी घेतलेला विराम (''डोंगरी... गिरगाव'') सांगताना जे कचरत होते. त्यांच्यापैकी अनेकजण त्यांच्या वसतीस्थानाचा इतिहास शोधण्यात अधिक गुंतले आणि हा इतिहास लिहून काढण्यात आणि त्याचे भागीदार होण्यात त्यांना अभिमान वाटत होता.

ब्रिटिश राजवटीत स्कॉटिश आश्रयाने सुरू झालेल्या विल्सन महाविद्यालयाने निम्म मध्य वर्गीय पार्श्वभूमी असलेल्या इंग्रजी भाषा न बोलणारा, कुंटुंबे, स्वातंत्र्य-सैनिकांची मुले, आणि त्याचप्रमाणे, इतर विद्यार्थ्यांचे नेहमीच स्वागत केले. वसाहत वादात मोकळा श्वास घेणे जेव्हा चिंताजनक समजले जाई तेव्हा त्यांनी लोकांना तो दिलासा दिला आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या अनेक पिढ्यांना उब दिली.

तेव्हाच्या विल्सन महाविद्यालयाचे विद्यार्थी जसे शेजारच्या भागातील होते तसेच त्याच भागातून त्यातील अनेकजण आजपर्यंत या महाविद्यालयात येतात, आज विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात इतिहास आणि त्यांचे शहराच्या इतिहासातील स्थान या दोहोंमधील संबंध निरखायला सुरुवात केली तो काळ काही दूरचा नाही. (गांधीजींच्या मीठाच्या सत्याग्रहाच्या काळात महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सत्याग्रहींना महाविद्यालयातच सुरक्षित आश्रय दिला होता आणि लाठीधारी पोलिसांसाठी दरवाजे बंद केले होते ही शेजाऱ्यांना जवळ करण्याची एक विस्मयकारक सूचककृती होती आणि शिक्षणासारख्या अगदी अलग असणाऱ्या जगताने असे राजकारण करणे हेही अन्यथा बरेच काही सांगून जाते.)

जर हा इतिहास अधिक स्पष्टरीतीने मांडला तर विल्सन महाविद्यालयासारख्या इमारती, वसतीस्थाने लहान शहरे वारसा जतन करावयाच्या वास्तू म्हणून त्या संवर्गीकृत होतात. त्यांच्या जागा लोकांच्या मागणीप्रमाणे भरता येतील. कारण ते लोक भूतकाळात तेथे राहिले होते आणि त्यांनी ज्या दिशेने आकार दिला आहे त्या पद्धतीने विद्यमान पिढी राहते. यामुळे शहराशी असलेले बंधपत्र बनावट करण्याच्या आणखी अशा प्रकारच्या एका मार्गाला परवानगी मिळेल. ज्यामध्ये कुणालाही त्याच्या कथावृत्तांतात हातचलाखी करणे अशक्य होईल. असा मार्ग की, ज्यामध्ये कुणालाही पुन्हा कधीही या कथावृत्तांताचे रणक्षेत्रात रुपांतर करण्यास संमती मिळणार नाही.

**अनुवादक : दत्ता कुलकर्णी**

▪ ▪ ▪ ▪ ▪

